स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या मानव्यविद्या शाखांतर्गत इतिहास विषयातील पीएच. डी. पदवीसाठी सादर करण्यात आलेला संशोधन आराखडा

"म. गांधी व मार्टीन ल्यूथर किंग (ज्यु.) यांच्या कार्याचा तुलनात्मक अभ्यास"

संशोधक विद्यार्थी

प्रेमला आश्रोबा माने

(एम. ए., एम. फिल., इतिहास)

संशोधन मार्गदर्शक

डॉ. नितिन बावळे

सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख,

शारदा महाविद्यालय (कला व विज्ञान), परभणी.

सदस्य, इतिहास अभ्यास मंडळ, स्वा. रा. ती. म. वि. नांदेड.

संशोधन केंद्र

ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी.

सप्टेंबर- २०२३

१.१ प्रस्तावना

भारताचा इतिहास अनेक व्यक्तींनी आपल्या कर्तृत्वाने समृद्ध केला आहे. भारताची संस्कृती सर्वात प्राचीन संस्कृती म्हणून गौरविण्यात आलेली आहे. भारताचा प्राचीन आणि मध्ययुगीन काळ पाहिला तर प्रत्येक काळात आपल्या अस्तित्वासाठी देशवासीयांनी लढा दिलेला दिसतो. हाच वारसा पुढे आधुनिक काळातही आपणास पाहावयास मिळतो.

प्राचीन काळाचा इतिहास पाहता असे लक्षात येते की, हिंदुस्थानचे पश्चिमी देशांशी व्यापारी संबंध चांगले होते. त्याचाच परिणाम म्हणून 16 व्या शतकाच्या अखेरीस इंग्लंडनेही हिंदुस्तानसोबत व्यापारी संबंध स्थापित करण्याच्या उद्देशाने प्रयत्न करण्यास प्रारंभ केला. याचीच परिणती पुढे सन 1600 मध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्या स्थापनेत झाली. केवळ व्यापारासाठी आलेल्या इंग्रजांनी हळूहळू हिंदुस्थानचे स्वामीत्व मिळवण्याचे स्वप्न पाहण्यास सुरुवात केली. एकीकडे ईस्ट इंडिया कंपनी आपले अस्तित्व नावारूपाला आणत असताना दुसरीकडे महाराष्ट्राच्या पवित्र भूमीत छ. शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराजाची स्थापना करून रयतेचे राज्य निर्माण केले होते. महाराजांच्या मृत्यूनंतर 1707 मध्ये औरंगजेबाचा मृत्यू झाला आणि याबरोबरच मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धाचाही शेवट झाला. पुढे पेशवाईचा अंमल सुरू असतानाच सन 1818 मध्ये इंग्रज आणि मराठ्यात जे युद्ध झाले ते शेवटचे ठरले. त्यात इंग्रजी सत्तेची सरशी होवून मराठेशाही बुडाली आणि हिंदुस्थानात केवळ व्यापारासाठी आलेल्या इंग्रजांनी लवकरच येथे आपल्या साम्राज्याची पाळेमुळे घट्ट रोवली. राज्यकर्ते बनलेल्या इंग्रजांनी

भेदनितीचा वापर करून आपली राज्य टिकवणे आणि मजबूत करण्यावर भर देणाऱ्या इंग्रजांचे हे राज्य जुलमी, अन्यायकारक व जाचक होते.

या अन्यायकारी जुलमी राजवटीला उलथून टाकण्यासाठी 1857 साली भारतीयांनी एकत्र येऊन उठाव केला. हा उठाव जरी यशस्वी झाला नाही तरी लोकांच्या लक्षात एक गोष्ट आली की, एकत्र येऊन एका ध्येयाने लढा दिल्यास परकियांना नक्कीच हकलवता येते. या उठावाचा दुसरा परिणाम असा झाला की, हिंदुस्थानातील ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता जाऊन येथे ब्रिटिश पार्लमेंटचे राज्य स्थापन झाले.

या ब्रिटिश राजवटीला उलथवण्यासाठी अनेक क्रांतिकारकांनी उच्च कोटीचे बलीदान दिले. जहाल - मवाळ विचारसरणीने हा लढा आपापल्या नीतीतत्वावर दिला. 1920 साली जहाल विचारांच्या टिळक युगाचा अस्त झाला आणि सत्य, अहिंसेच्या मार्गाने आपल्या जीवनातील समस्येवर यशस्वीरीत्या समाधानकारक उत्तर देणाऱ्या म.गांधींचा उदय भारतीय राजकारणात झाला.

म.गांधीजींनी संपूर्ण जगाला राजकीय तत्वज्ञानाचा भक्कम आधार तर दिलाच पण त्याचबरोबर जगण्याचा मार्ग दाखवून त्यावर चालण्याचा विचारही दिला होता. स्वातंत्र्य लढ्यात भारत देशाला त्यांच्या विचाराची भुरळ पडली होती. त्याचाच परिणाम म्हणून भारतीय जनता त्यांच्या एका इशाऱ्यावर लाठ्या-काठ्या अंगावर झेलण्यास, तुरुंगात जाण्यास, आंदोलने करण्यास तयार झाली होती. म. गांधी म्हणतील ती पूर्व दिशा असे अलिखितपणे ठरून गेले होते. म.

गांधीजींनी संपूर्ण भारत देशाला सोबत घेऊन अहिंसात्मक मार्गाने जो यशस्वी लढा दिला. त्याची फलश्रुती म्हणजे 15 ऑगस्ट 1947 रोजी भारताला मिळालेले स्वातंत्र्य होय.

म. गांधीजींच्या अहिंसात्मक विचारधारेत एक आंतरिक ऊर्जा होती आणि ही ऊर्जा जगातील हिंसेने होरपळणाऱ्या समाजावर, असमानतेचा सामना करावा लागणाऱ्या समाजमनावर शांतीचं लेपन करणारी होती. म. गांधीजींच्या या अहिंसा विचाराने जगाचा कानकोपरा उजळून टाकण्यास सुरुवात केली होती. यापासून कोणीही सुटू शकले नाही.

अमेरिकेतील एका तरुण, तडफदार नवयुवकाच्या मनावरही गांधीजींच्या अहिंसा तत्वाने ताबा घ्यायला सुरुवात केली होती. त्याचा परिणाम म्हणजे त्यांनी गांधीवरील अनेक पुस्तके वाचून अहिंसेच्या तत्वज्ञानाचा अभ्यास करण्यास प्रारंभ केला. त्यातूनच पुढे कृष्णवर्णीयांच्या लढ्याला अहिंसात्मक मार्गाने नेतृत्व देणारा अमेरिकेतील एक चेहरा म्हणून मार्टिन ल्युथर किंग (ज्यू.) चा उदय अमेरिकेच्या इतिहासात झाला.

आज ज्या अमेरिका राष्ट्रांकडे आपण एक प्रगत देश म्हणून पाहतो त्या अमेरिकेच्या इतिहासात डोकावले असता 20 व्या शतकाच्या सुरुवातीस येथील समाजात तीव्र भेदभाव पाहवयास मिळतो. वर्णभेदामुळे समाजाचे दोन भागात विभाजन झाले होते. 'गोरे' म्हणजे वरिष्ठ तर 'काळे' म्हणजे कनिष्ठ अशी अन्यायकारी संस्कृती येथील लोकांच्या मनात रुजली होती. व्यक्तीची पारख त्याच्या स्वभाव वैशिष्टयावरून न होता त्याच्या रंगावरून होत असे. कृष्णवर्णीयासाठी वेगळे कायदे व नियम होते. केवळ रंगामुळेच कृष्णवर्णीयांचे ' माणूसपण'

देखील नाकारण्यात आले होते. ज्या समाजाचे माणूसपणच नाकारले असेल तर त्या समाजाला मिळणारी वागणूक ही हीनपणाची, तुच्छ, भेदभावाचीच असेल हे सांगण्यासाठी कोणत्याही संशोधनाची गरज नाही.

कृष्णवर्णीय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या समाजातच पुढे मार्टीन ल्यूथर किंग (ज्यु.) यांचा जन्म झाला. त्यांना ' अमेरिकेचे गांधी ' असेही म्हणतात. त्यांनी रंगभेदाविरुद्ध यशस्वी लढा दिला. शिकागो आंदोलन असो की समान नागरी कायदा यासाठीचे त्यांनी केलेले प्रयत्न समाजाला दिशा देणारे होते. 1 डिसेंबर 1955 मध्ये मोंटगोमेरी या ठिकाणी बस बहिष्कार सारखी घटना घडली व त्यातून एक आंदोलन जन्मास आले. या आंदोलनाचे नेतृत्व मार्टीन ल्यूथर किंग (ज्यु.) यांनी केले होते. त्यांना त्यांच्या आयुष्यात श्वेत रंगाविरोधात अश्वेत रंगाचा लढा द्यावा लागला होता. तसेच त्यांनी शिकागो आंदोलनाच्या माध्यमातून समान नागरी कायदा पारित होण्यासाठी प्रयत्न केले. अवघे 39 वर्षाचे आयुष्य लाभलेल्या मार्टीन ल्यूथर किंग (ज्यु.) यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने लोकांच्या मनात आपले स्थान अढळ निर्माण केले आहे.

१.२ विषय निवड : -

निसर्गाने कुठलाही भेदभाव न करता संपूर्ण सृष्टी सर्वांसाठी सारखीच बनवली. येथील नैसर्गिक व मानवनिर्मित वस्तू सर्व मानवजातीसाठी एक सारख्याच उपलब्ध व्हाव्यात व सर्वांना उपभोगता याव्यात या एकाच उद्देशाने. जन्मताच श्रेष्ठत्वाचे वरदान मिळालेल्या लोकांनी मात्र हा उद्देशच पायदळी तुडवला. यातूनच रंगभेद, वर्गभेद, वर्णभेद आणि जातीभेद

या सारखे वणवे पेटले. ज्याचा पुढे भडका उडून मोठमोठी आंदोलने उभी राहिली. भारतात आलेल्या ब्रिटिशांनी ही असा भेद करून भारतीयांचे अनेक प्रकारे शोषण करायला सुरुवात केली. त्याला उत्तर देण्यासाठी गांधीजींनी सत्य व अहिंसेच्या मार्गाने असहकाराचे शस्त्र उपसले होते. त्याचाच आदर्श घेऊन अमेरिकेत मार्टीन ल्यूथर किंग (ज्यु.) यांनी रंगभेदाच्या अन्यायकारक प्रवृत्तीला नष्ट करण्यासाठी अहिंसेच्या मार्गाने यश प्राप्त केले होते. या पार्श्वभूमीवर म. गांधी व मार्टीन ल्यूथर किंग (ज्यु.) या दोन राजकीय नेतृत्वाच्या कार्याचा परामर्श घेण्यासाठी " म. गांधी आणि मार्टीन ल्यूथर किंग (ज्यु.) यांच्या कार्याचा तुलनात्मक अभ्यास " हा विषय प्रस्तुत संशोधकाने निवडला आहे.

१.३ संशोधनाची उद्दीष्टे :-

संशोधन विषयासाठी निश्चित करण्यात आलेले उद्धिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

1. म. गांधी व मार्टिन ल्युथर किंग (ज्यु.) कालखंडातील राजकीय, सामाजिक, धार्मिक, व आर्थिक परिस्तिथीचा आढावा घेणे.
2. म. गांधी व मार्टिन ल्युथर किंग (ज्यु.) यांच्या विचारसरणीतील साम्यस्थळे शोधणे.
3. म. गांधी व मार्टीन ल्यूथर किंग (ज्यु.) यांच्या कार्याचा व तत्तवाज्ञानाचा तुलनात्मक अभ्यास करणे.
4. म. गांधी व मार्टीन ल्यूथर किंग (ज्यु.) यांच्या कार्याचा तत्कालीन राजकीय, सामाजिक, धार्मिक, व आर्थिक परिस्थितीवर पडलेल्या प्रभावांचे परिणाम अध्ययन करणे.

१.४ संशोधन विषयाचे महत्त्व :-

म. गांधींनी आपल्या सत्य, अहिंसा, स्वदेशी, असहकार या तत्वाच्या बळावर शस्त्रधारी ब्रिटीशांना तोडीस तोड उत्तर दिले होते. त्यांच्या विचारांचा प्रभाव अनेक बुद्धीवादी व सर्वसामान्य लोकांवर पडला होता. आजही रशिया - युक्रेन सारख्या युध्दातील हिंसाचार पाहील्यावर गांधीजींची अहिंसाच प्रत्येक सामान्य नागरिकाला संयुक्तिक वाटते. याचप्रमाणे अमेरिकेत मार्टिन ल्युथर किंग (ज्यु.) यांनी अहिंसेच्या तत्त्वाचा अवलंब करून अन्यायाविरुद्ध यशस्वी लढे देवून सर्वसामान्य अन्यायग्रस्त समाजाला स्वाभिमानाने जीवन जगायला शिकवले. या दोन्ही महान व्यक्तींची कार्यप्रणाली आजही वैयक्तिक पातळीवर तसेच सामाजिक स्तरावर जीवन जगताना उपयुक्त असल्याचे जाणवते. त्यामुळे प्रस्तुत संशोधन विषय महत्त्वाचा ठरतो.

१.५ समास्यासुत्रण:-

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी निश्चित केलेली गृहितके पुढीलप्रमाणे मांडली आहेत.

1. म. गांधी व मार्टीन ल्यूथर किंग (ज्यु.) यांनी अहिंसात्मक मार्गाचा अवलंब करून राजकीय व सामाजिक सुधारणासाठी केलेल्या कार्याचा तुलनात्मक अभ्यास करणे.
2. म. गांधी व मार्टीन ल्यूथर किंग (ज्यु.) यांनी सामाजिक व राजकीय हक्कासाठी प्रस्थापितांविरोधात जो तीव्र लढा दिला, त्याचा अभ्यास करणे.
3. म. गांधी व मार्टीन ल्यूथर किंग (ज्यु.) यांच्या कार्यपद्धतीतील समानता शोधणे.

१.६ संशोधन पद्धती : -

" सामाजिक घटना व सामाजिक समस्यांच्या बाबतीत नवीन ज्ञान प्राप्त करून घेण्याच्या उद्देशाने केलेले क्रमबद्ध प्रयत्न होय. " (मोझर) असे संशोधनाबाबत म्हणतात. या अनुषंगाने जे सत्य आहे त्याची तपासणी करणे, आधीच्या ज्ञानात भर टाकते व नवीन अभ्यास करणे इ. बाबी संशोधनात साधल्या जातात. या सर्व बाबींचा आधार घेऊन संशोधन करण्याचा प्रयत्न संशोधक करणार आहे. यासाठी प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनांचा वापर येथे करण्यात येणार आहे. सोबतच विश्लेषणात्मक व वर्णनात्मक संशोधन पद्धती वापरून संशोधन पुर्ण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

१.७ प्रकरण योजना :-

प्रकरण पहिले : प्रस्ताविक.

संशोधकाने प्रस्तुत प्रकरणात संशोधन विषयाची प्रस्तावना मांडत असतानाच या प्रकरणात विषय निवड, संशोधनाची उद्दीष्टे, संशोधन विषयाचे महत्त्व, संशोधन विषयासंबंधीची गृहितके, संशोधन पद्धती इ.चा अंतर्भाव केला आहे.

प्रकरण दुसरे : म. गांधी यांचे जीवन व कार्य.

म. गांधींच्या संपूर्ण जीवन कार्याचा आढावा प्रस्तुत प्रकरणात घेण्यात येणार आहे. यात म. गांधी यांचे बालपण, शिक्षण, त्यांनी दिलेले लढे, त्यांचे विविध कार्ये, सत्य, अहिंसा,

स्वदेशी, असहकार या संकल्पना समजावून घेणे, तसेच त्यांचे शिक्षण विषयक कार्य, त्यांची जीवनशैली याचा उहापोह प्रस्तुत प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे : मार्टिन ल्युथर किंग (ज्यु.) यांचे जीवन व कार्य.

तिसऱ्या प्रकरणात मार्टीन ल्यूथर किंग (ज्यु.) यांच्या आयुष्यातील प्रेरक प्रसंग, त्यांचे बालपण, त्यांनी अहिंसेच्या मार्गाने दिलेला अश्वेत वर्गाचा लढा, वयाच्या 35 व्या वर्षी ज्या घटनेसाठी त्यांना नोबेल पारितोषिक मिळाले त्या घटनेचा व इतर बाबींचा आढावा घेत त्यांच्या मृत्यूपाशी येवून हे प्रकरण संपते.

प्रकरण चौथे : म. गांधी व मार्टीन ल्यूथर किंग (ज्यु.) यांच्या कार्याचा तुलनात्मक अभ्यास.

प्रस्तुत प्रकरणात म.गांधी व मार्टिन ल्युथर किंग (ज्यु.) यांच्या कार्याचा एकत्रित अभ्यास केला जाणार आहे. हा अभ्यास करत असतानाच दोघांच्या कार्यपद्धतीची, त्यांच्या विचारसरणीची, आयुष्याकडे बघण्याच्या दृष्टीकोनाची, दोघांवरील विचार प्रभावांची तुलना करण्यात येणार आहे. सदर प्रकरणात त्यांनी दिलेल्या संघर्ष लढ्यांचा अभ्यास तर केला जाणार आहेच, त्याचबरोबर त्यांच्या जीवनात काही समान धागेदोरे आहेत का ? हे देखील तपासले जाणार आहे.

प्रकरण पाचवे : निष्कर्ष.

निष्कर्षाशिवाय संशोधन पुर्ण होवूच शकत नाही. यात संशोधनाचे सार असते म्हणूनच निष्कर्ष हा संशोधनातील महत्त्वाचा भाग असतो. केवळ निष्कर्ष जरी वाचला तरी संशोधकाने कशाप्रकारे संशोधन केले, त्यात काय मांडले याची कल्पना येते. त्यामुळेच निष्कर्षाचे पाचवे प्रकरण प्रस्तुत संशोधकाने शोध प्रबंधात घेतले आहे.

संदर्भ सुची :-

1. Gandhi, M. K. , Nov. 1959, Economic and Industrial Life and Relations, Navajivan Publishing House, Ahmedabad , Second Edition.
2. Gandhi, M. K. , 1968, Selected Work of Gandhi, Vol. I, Navajivan Publishing House, Ahmedabad .
3. गांधी मो. क. , सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा (अनु. पटवर्धन एस. पी.), नवजीवन मुद्रणालय, अहमदाबाद.
4. गांधी मो. क. , 1967, म. गांधी यांचे संकलीत वाङ:मय (अनु. शिखरे दा.न.) , संचालक, प्रसिद्धी विभाग, महाराष्ट्र सरकार, मुंबई 1, भाग 13 व इतर.
5. नेहरू, ज. मो. , 1976, भारताचा शोध (अनु. साने गुरुजी व इतर) कॉन्टीनेंटल प्रकाशन, विजया कॉलनी, 30.
6. भावे विनोबा, 2000, प्रेमग्रंथ अहिंसेचा (विनोबाची जीवनकथा त्यांच्याच शब्तात), डॉ. पराग चोळकर, परधाम प्रकाशन, पवणार, वर्धा- 11, आवृत्ती चौथी.

7. टिळक बाळगंगाधर, समग्र लोकमान्य टिळक, प्र. खंड 4.

8. ईनामदार ना. र. 1960 लोकहितवादीची शतपत्रे, अ. अं. कुलकर्णी, कॉन्टीनेंटल प्रकाशन पुणे 2, आवृती दुसरी.

9. कातगडे पुंडलिकजी, डिसेंबर 1970, गांधी दर्शन अर्थात गांधीजींचा अध्यात्म जीवनयोग, डॉ. मीना पै. , अरुणराज प्रकाशन, 188 एच. , भीमरावंवाडी, ठाकुर द्वार, मुंबई- 2.

10. केळकर न. चि., 1 ऑगस्ट 1998, लोकमान्य यांचे चरित्र, वरदा बुक्स (ह. अ. भावे), 397/1, सेनापती बापट मार्ग, पुणे- 411016, आवृत्ती दुसरी, खंड 2, भाग 4.

11. कुंभार नागोराव (संपा.), डिसें. 1995, म. गांधी : विचारदर्शन, सौ. प्रेमा कुंभार, शिवनगर, लातूर.

12.केतकर श्री. व्यं. , 1925, महाराष्ट्र ज्ञानकोश, श्रीधर - व्यंकटेश केतकर, 841, सदाशिव पेठ, पुणे.

13.खेर भा. द., 1 ऑगस्ट 1972, लोकमान्य टिळक दर्शन, ज. श्री. टिळक, केसरी प्रकाशन, 568, नारायण पेठ, पुणे 30, आवृती दुसरी.

14.जावडेकर श. द., 1944, आधुनिक भारत, कॉन्टीनेंटल प्रकाशन विजयनगर, पुणे- 30.

15.पुंडे दि. (संपा.), गांधीवाद आणि आधुनिक मराठी साहित्य, प्रतिमा प्रकाशन, 1362 सदाशिव पेठ, पुणे 30, आवृती प्रथम.

16.डॉ. धोंगडे आश्विनी, स्वातंत्र्ययोद्धा मार्टिन ल्युथर किंग (ज्यू.), दिलीपराज प्रकाशन, प्रा.

लि., 251 क, शनिवार पेठ, पुणे-411030.

17.कुंभार दिनकर, मार्टिन ल्युथर किंग, पेपर बैक्स, 4/19, आसफअली रोड, नई दिल्ली-110002, संस्करण 2021.

18.परचुरे किर्ति, समानतेचे स्वप्न पाहणारा मुक्तीदाता मार्टिन ल्युथर किंग, कनक बुक्स, कुमार वाङमय विभाग, डायमंड पब्लिकेशन, 264/3, शनिवार पेठ, 302, अनुग्रह अपार्टमेंट, ओंकारेश्वर मंदिराजवळ, पुणे 411030.

19. https://en.wikipedia.org/wiki/Martin_Luther_King_Jr.

संशोधक विध्यार्थी

माने प्रेमला आश्रोबा

(एम.ए.,एम.फिल. इतिहास)

संशोधक मार्गदर्शक

डॉ. नितिन पी. बावळे

सहयोगी प्राध्यापक व विभागप्रमुख,

शारदा महाविद्यालय (कला व विज्ञान),

परभणी.

सदस्य, इतिहास अभ्यास मंडळ,

स्वा. रा. ती. म. वि. नांदेड.